**शैक्षणिक वर्ष २०१६-१७ :**
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये
नवीन विद्याशाखांना मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक : एनजीसी २०१६/(१०१/१६)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०४ जुलै, २०१६

संदर्भ: १. शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि-४, दि. ३०.१०.२०१०.
२. शासन निर्णय क्रं. एनजीसी २०१२/(२४७/१२)/मशि-४, दि. ०२.०९.२०१३.

## शासन आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२ व ८३ अणि संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी नवीन विद्याशाखांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची शासन निर्णय एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि. २ सप्टेंबर, २०१३ अन्वये छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननी वा महाविद्यालयांनी प्राप्त केलेला नॅक दर्जा विचारात घेऊन पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८३(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन विद्याशाखांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्था/महाविद्यालयाचे नाव व पत्ता | विद्याशाखा |
|---|---|---|
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | | |
| १. | महात्मा गांधी विद्यामंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, हरसुल, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक. | बी. एस्सी. |
| संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | | |
| २. | भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती. | बी. एस्सी. भाग-१ (इंग्रजी, मराठी, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित) |

| | | |
|---|---|---|
| ३. | मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती. | बी. एस्सी. भाग-१ (इंग्रजी, मराठी, हिंदी, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित) |
| ४. | श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती. | बी. ए. भाग-१<br>बी. कॉम भाग-१ |
| ५. | तक्षशिला महाविद्यालय, अमरावती. | बी. एस्सी. भाग-१ |
| ६. | महिला कला, वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती. | बी. कॉम भाग-१ |
| ७. | सीताबाई कला महाविद्यालय, अकोला, ता. जि. अकोला. | बी. कॉम. भाग-१ (इंग्रजी माध्यम)<br>बी. एस्सी भाग-१ (इंग्रजी माध्यम) |
| ८. | लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ. | बी. कॉम. (इंग्रजी माध्यम) |
| **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.** | | |
| ९. | नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाचे, संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकुर, जि. लातुर. | बी. कॉम. |
| १०. | भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातुर. | बी. कॉम. |
| **सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.** | | |
| ११. | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, मंद्रुप हायवे न.१४९, ता. मोहोळ, जि. सोलापूर. | विज्ञान- बी. एस्सी. |
| १२. | सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर. | वाणिज्य- बी. कॉम. |
| १३. | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर. | विज्ञान- बी. एस्सी. |
| **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.** | | |
| १४. | डी. आर. माने महाविद्यालय, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर | विज्ञान |
| १५. | मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. | विज्ञान |
| १६. | महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, ७/ई, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. | विज्ञान |
| १७. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगांव. | विज्ञान |

| | | |
|---|---|---|
| १८. | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर. | वाणिज्य |
| १९. | श्रीपतराव चौगुले आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, माळवाडी कोतोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर. | विज्ञान-बी.एस्सी. भाग १ |
| २०. | कला महाविद्यालय, कोवाड | विज्ञान |
| २१. | बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली. | विज्ञान |
| २२. | मिरज महाविद्यालय, बुधगावकर मळा, शासकीय दूध डेअरीशेजारी, मिरज, ता. मिरज, जि. सांगली. | विज्ञान |
| २३. | कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी, मु. पो. मायणी, ता. खटाव, जि. सातारा. | विज्ञान |

२. **अटी व शर्ती :-**

१. अस्तित्वात असलेल्या ज्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयाने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

२. महाविद्यालयाने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

३. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी ३० ऑगस्ट पर्यंत करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

४. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

५. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

६. संबंधित विद्यापीठांनी, वरील विवरणपत्रातील महाविद्यालयांनी प्रकरणपरत्वे नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

३. विद्यापीठांनी संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या विद्याशाखांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर विद्याशाखांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर विद्याशाखांची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०४११४१०९४९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2016.07.05 12:25:24 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
४) संबंधित संस्था,(विद्यापीठामार्फत)
५) निवड नस्ती (मशि-४).